राज्यामध्ये दि.१४ एप्रिल,२०१८ हा दिवस सामाजिक न्याय दिवस म्हणून साजरा करताना राबवावयाच्या कार्यक्रमांबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः सान्यावि-२०१८/प्र.क्र.१२३/बांधकामे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: १३ एप्रिल, २०१८.

संदर्भ:- १) केंद्र शासनाचे D.O.No.१७०२०/I/२०१८-SCD-VI (DAF), दि.५ एप्रिल, २०१८ चे पत्र.
२) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्रमांकः व्हीपीएम-२०१८/प्र.क्र.२०३/पंरा-३, दि.१३/४/२०१८.

प्रस्तावना :-

उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालयामार्फत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक एकात्मतेस प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने दि.१४/४/२०१८ ते ५/५/२०१८ हा कालावधी “ग्राम स्वराज अभियान” म्हणून राबविण्याचे आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिन **दि.१४/४/२०१८ हा दिवस “सामाजिक न्याय दिवस”** म्हणून साजरा करण्याचे निर्देश दिलेले असून संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये ग्राम विकास विभागामार्फत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिन **दि.१४/४/२०१८ हा दिवस “सामाजिक न्याय दिवस”** म्हणून साजरा करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने दि.१४/४/२०१८ या दिवशी सदर दिन साजरा करताना हाती घ्यावयाचे विविध कार्यक्रम राबविण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिवस, दिनांक १४ एप्रिल,२०१८ हा दिवस “**सामाजिक न्याय दिवस”** म्हणून साजरा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

२. त्यानुषंगाने, दि.१४/४/२०१८ या दिवशी विविध प्रशासकीय विभाग व त्याच्या अधिनस्त कार्यालयांनी खाली नमूद केल्याप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे निर्देश या शासन निर्णयान्वये देण्यात येत आहेत:-

१) या दिवशी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मरणार्थ विविध उपक्रम आयोजित करण्यात यावेत - सार्वजनिक व्याख्याने, विद्वान /शिक्षणतज्ञांची व्याख्याने, वाद-विवाद स्पर्धा, राष्ट्रीय समरसता/सामाजिक न्याय या संकल्पनांवर आधारित शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या प्रश्न मंजूषा स्पर्धा आयोजित करणे, सामाजिक न्यायाकरीता विविध प्रकारच्या दौड आयोजित करणे, पंचायत स्तरावर प्रज्ञावंत मुलांसाठी गौरवात्मक कार्यक्रम आयोजित करणे.

२) शाळाबाहय मुलांची ओळख पटविणे तसेच ज्यांना जात आणि उत्पन्नाचे प्रमाणपत्र आवश्यक आहे अशा मुलांसाठी जात आणि उत्पन्नाचे प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्याकरीता या पंधरवडयात शिबीरे आयोजित करावीत.

३) ज्या अनुसूचित जातीच्या कुटुंबांकडे जात आणि उत्पन्नाचे प्रमाणपत्र नाही, अशा कुटुंबांना जात आणि उत्पन्नाचे प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्याकरीता या पंधरवडयात दि.१४/४/२०१८ पासून शिबिरे आयोजित करण्यात यावीत. संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांनी अशी शिबिरे यांच्या अधिनीस्त यंत्रणेकडून आयोजित करावीत.

४) इयत्ता ८ वी पासूनपुढील इयत्तेतील सर्व मुलांची शाळांमध्ये नोंदणी करावी. शालेय शिक्षण विभागाने ही कार्यवाही करावी.

५) १०० टक्के विद्यार्थ्यांची नोंदणी झाल्याची खात्री करण्यात यावी. शालेय शिक्षण विभागाने ही कार्यवाही करावी.

६) पात्र अनुसूचित जाती विद्यार्थ्यांची उत्पन्नाच्या निकषावर योग्य त्या शिष्यवृत्ती योजनेतून मॅट्रीकपुर्व शिष्यवृत्ती आणि मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीकरीता नोंदणी करण्यात यावी. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सहायक आयुक्त व उपआयुक्त यांनी ही कार्यवाही करावी.

वरील उपक्रम मोहिमेच्या माध्यमातून म्हणून दि.१४/४/२०१८ पासून राबविण्यात यावेत. या कार्यक्रमांचे संनियत्रण MIS च्या माध्यमातून करण्यात येईल. त्याचा तपशील लवकरच उपलब्ध करुन देण्यात येईल.

३. सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने कार्यक्रमाचा आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी विहीत कालावधीत पुर्ण करण्यासाठी आयुक्त, समाजकल्याण, पुणे हे संनियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहतील.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०४१३१८३९२७७९२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vishakha Sachin Adhav

Digitally signed by Vishakha Sachin Adhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1d4700e952a830d47e7b2f63ad9254269391a93afec7d28ddf93bcbec52721ac, cn=Vishakha Sachin Adhav
Date: 2018.04.13 18:42:32 +05'30'

(वि.स.आढाव)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव

२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई -३२

३) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई - ३२.
४) मा.मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
५) मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
६) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
७) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
८) आयुक्त, समाजकल्याण, पुणे
९) महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण केंद्र, पुणे
१०) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य
११) सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य
१२) सर्व समाज कल्याण अधिकारी, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य
१३) निवडनस्ती बांधकामे